नि.फौ.ख.क्र.१२/२०२१
सखुबाई वि. जगन्नाथ
निशाणी २४

## दोषारोपपुर्वीचा पुरावा

## तक्रारदारतर्फे साक्षीदार क्र.१ यांची साक्ष

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव** :– सखुबाई महादेव खिलारी
**वय** :– ६० वर्षे, **धंदा** :– घरकाम,
**राहणार** :– शेणवडी, ता. माण, जि. सातारा.

## सरतपासणी तक्रारदारतर्फे – व्ही.बी.पाटील विद्यमान वकील यांचेमार्फत

**०१.** गावी मी आणि माझे पती असे पाच वर्षांपासून राहत आहोत. त्यापूर्वी आम्ही मुंबई येथे राहत होतो. आम्ही मुंबई येथे चाळीस वर्षे राहिलो. दि. ०५/०४/२०१६ रोजी माझे मणक्याचे ऑपरेशन झाले होते. दि. ०७/०७/२०१७ रोजी माझ्या पिशवीचे ऑपरेशन झाले होते. या कालावधीमध्ये मला चालता–फिरता येत नव्हते. माझे पती गावी येवून जावून शेती करीत होते.

**०२.** आरोपी क्र. १ जगन्नाथ श्रीमंत गळवे हा माझा भाचा आहे. बलभिम गळवे, श्रवण खांडेकर हे आमच्या गावातील आहेत. मला मनमंदीर को.ऑप. बँकेचे कार्यालय माहिती आहे. मला प्रशांत विश्वनाथ पाटील हे माहितीचे आहे. गळवेवाडी माझे माहेर आहे.

**०३.** गळवेवाडी येथील गट क्र. १५४ ही माझा भाउ श्रीमंत बाबा गळवे याने जगन्नाथ याच्या नावे खरेदीपत्राद्वारे विक्री केली. गट क्र. १५४ मध्ये सहहिस्सेदार म्हणून संजय विठोबा माळी यांचे नाव होते. जगन्नाथ व संजय यांची मिळून गट क्र. १५४ मध्ये एकूण पाच एकर क्षेत्र होते. दि. २३/०९/२००८ रोजी संजय व जगन्नाथ यांनी गट क्र. १५४ मधील पाच एकर क्षेत्र माझ्या हक्कात रक्कम रुपये दोन लाख ला नोंदणीकृत विक्रीपत्राद्वारे करुन दिले. खरेदी

तारखेपासून सदर पाच एकर क्षेत्र माझ्या मालकी व ताब्यात होते. सदर खरेदीपत्राआधारे फेरफार क्र. १६७७ अन्वये माझ्या नावाची नोंद महसूल दप्तरी झाली होती. सदर मालमत्तेवर सुमीत्रा ग्रामीण बिगर शेती पतसंस्था, अकलुज शाखा पिलीव चे कर्ज असल्यामुळे माझ्या नावाची नोंद रद्द झाली. मी त्या रद्द झालेल्या नोंदीच्या विरुद्ध अपील दाखल केलेले होते. ते प्रलंबित आहे.

**०४.** जगन्नाथ याने सातबारा दप्तरी त्याच्या नावाची पोकळ नोंदीआधारे सन २०१४ मध्ये मनमंदीर को.ऑप. बँक, शाखा आटपाडी या बँकेकडून गट क्र. १५४ मधील जमीन तारण ठेवून रक्कम रुपये पाच लाखाचे कर्ज काढले होते. जगन्नाथ याने कर्जाची परतफेड केली नसल्यामुळे बँकेने सदर जमीन लिलावास काढली. बँकेने लिलावामध्ये जगन्नाथ याचे क्षेत्र प्रशांत विश्वनाथ पाटील यांना विक्री केले.

**०५.** मी जगन्नाथ व इतरांना विकालांमार्फत नोटीस देवून त्याबाबत कळविले. नोटीस सर्व लोकांना मिळाल्या. त्या सर्वांनी खोट्या मजकूराच्या नोटीस उत्तर मला पाठविले. मी प्रस्तुत प्रकरणामध्ये माझ्या हक्कात करुन दिलेल्या खरेदीपत्राची प्रमाणीत प्रत दाखल केलेली आहे. मी या प्रकरणामध्ये बँकेला जगन्नाथ याने करुन दिलेली तारण गहाणखताची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. बँकेने लिलावाद्वारे प्रशांत विश्वानाथ पाटील करुन दिलेल्या विक्रीपत्राची छायांकीत प्रत प्रस्तुत प्रकरणात दाखल केली आहे. जगन्नाथ गळवे याने खोटी कागदपत्रे तयार करुन माझी फसवणूक केली आहे.

**०६.** आता मला मी वकीलांमार्फत पाठविलेली दिनांक २८/१०/२०२० रोजीची नोटीस दाखविण्यात आली. त्यावर माझी व माझ्या वकीलांची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी २५** देण्यात येते. मी पाठविलेली नोटीस मिळाल्याबाबत तीन पोच पावत्या दाखल केलेल्या

**नि.फौ.ख.क्र.१२/२०२१**
**सखुबाई वि. जगन्नाथ**
**निशाणी २४**

आहेत. त्यास अनक्रमे **निशाणी २६ ते २८** देण्यात येते. आरोपी क्र. १ याने त्याच्या वकीलामार्फत मला पाठविलेल्या नोटीस उत्तराची प्रत दाखल केली आहे. त्याचप्रमाणे बँकेने पाठविलेले नोटीस उत्तराची प्रत आणि प्रशांत विश्वनाथ पाटील याने पाठविलेल्या नोटीस उत्तराची प्रत पटलावर दाखल केली आहे.

आरोपी क्र. १ जगन्नाथ याला मालमत्ता मला विक्री केल्यानंतर त्या मालमत्तेवर कर्ज घेण्याचा अधिकार नव्हता आणि जगन्नाथ याने खोटे कागद तयार करुन माझी फसवणूक केली आहे. मी आटपाडी येथील दिवाणी न्यायालयामध्ये या मालमत्तेसंदर्भात हक्क शाबितीकरीता व मनाई हुकूमाकरीता नियमीत दिवाणी दावा क्र. १४३/२०२० दाखल केला आहे. तो प्रलंबित आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे – श्री.ए.डी. वसेकर, विद्यमान वकील यांनी राखीव ठेवला.**

श्रवणोत्तर स्विकृती,
समक्ष,

RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Digitally signed by RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Date: 2025.03.11 14:55:28 +0530

दि. ११/०३/२०२५
आटपाडी.

( आर. बी. कुलकर्णी )
सह न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
आटपाडी